ePaper
काँग्रेसने भाकरी फिरवली, मुंबई अध्यक्षपदी वर्षा गायकवाड



वर्ष - 7 । अंक -44 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- पुण्यातील लोकसभा पोटनिवडणुक काँग्रेस लढवणार!
- राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांना जीवे मारण्याची धमकी: माथेफिरूंना तात्काळ अटक करा!

www.mahaenews.com | ।शनिवार, दि. 10 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपच्या निवडणूक प्रमुखांमध्ये नव्या तरुण चेहऱ्यांना संधी!

## आमदारकीसाठीच्या इच्छुकांनाच भाजपने केले विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभेबरोबरच आगामी विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी भाजपने महाराष्ट्रात सुरु केली आहे. त्याचा एक भाग म्हणून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्वच्या सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी निवडणूक प्रमुख नियुक्त केले. त्यात पिंपरी-चिंचवडमध्ये नव्या तरुण चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. राज्यातील ४८ लोकसभा आणि २८८ विधानसभेच्या निवडणूक प्रमुखांच्या घोषणेचे ट्विट बावनकुळे यांनी केले. मात्र, काही वेळातच विधानसभा प्रमुखांचे ते डिलीट करण्यात आले.**



भोसरी, चिंचवड आणि पिंपरी असे तीन विधानसभा मतदारसंघ पिंपरी-चिंचवडमध्ये आहेत. त्यांचे निवडणूक प्रमुख म्हणून अनुक्रमे विकास डोळस, काळूराम बारणे, अमित गोरखे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

डोळस आणि बारणे हे माजी नगरसेवक आहेत. डोळस हे भोसरीचे भाजप आमदार आणि शहराध्यक्ष महेश लांडगे यांचे कट्टर समर्थक आहेत. तर, गोरखे हे उच्चशिक्षित तरुण असून सध्या प्रदेश सचिव आहेत. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे ते अध्यक्ष होते. २०१९ पर्यंत भाजपचा बालेकिल्ला असलेल्या मावळात २०१९ ला राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (NCP) सुनील शेळके हे प्रचंड मताधिक्याने विजयी झाले आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघाचे घाटावर पिंपरी, चिंचवड आणि मावळ असे तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. तर, घाटाखालील पनवेल, उरण आणि कर्जत या विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख म्हणून नितीन पाटील, अरुण भगत आणि किरण ठाकरे यांना संधी देण्यात आली आहे.

### मावळात पुन्हा भाजपचा आमदार निवडून आणणार

**मावळ विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख म्हणून भाजपने मावळ तालुकाध्यक्ष रविंद्र भेगडे यांची नेमणूक केली आहे. गेली तीन वर्षे ते ही जबाबदारी सांभाळत आहेत. गतवेळच्या विधानसभेला ते इच्छूक होते. येणारी विधानसभा, लोकसभा नाही, तर प्रत्येक निवडणुकीत पक्षाला विजयी करण्याचे आपले ध्येय असणार आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.**

### पिंपरीतून पक्षाचा आमदार निवडून आणणार

महाराष्ट्रात २०२४ ला पुन्हा शिंदे-फडणवीस सरकार यावे, यासाठी पिंपरीतून पक्षाचा आमदार निवडून आणणार, राष्ट्रवादीकडून ही जागा हिसकावून घेणार, अशी प्रतिक्रिया गोरखे यांनी नव्या नियुक्तीवर दिली. नमूद करण्याजोगी बाब म्हणजे त्यांचे नाव पिंपरीत विधानसभेचा

# वारकऱ्यांच्या सेवेसाठी पालिकेकडून १२ पथके

## पालखी मुक्काम व दिंड्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी सुविधा पुरवण्याची जबाबदारी

। पिंपरी । महाईन्यूज

**संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी वारकऱ्यांना विविध सेवासुविधा पुरविण्यासाठी महापालिका आयुक्तांनी १२० अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे.**

त्यांची १२ पथकांत विभागणी केली असून, प्रत्येक पथकात एक ग्रुप कमांडर, एक सहायक ग्रुप कमांडर आणि आठ सहायक आहेत. असे १२ अधिकारी ग्रुप कमांडर व १२ अधिकारी सहायक ग्रुप कमांडर आणि मदतीला ९६ अधिकारी व कर्मचारी असतील. त्यांच्यावर आपत्ती नियंत्रण कक्षाची जबाबदारी आहे. संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील निगडी ते दापोडी दरम्यान आठ आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर चार टप्पे निश्चित केले असून प्रत्येक टप्प्याची जबाबदारी एक पथकावर आहे. पालखी मुक्काम व विसाव्यासह दिंड्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी पाणीपुरवठा, आरोग्य, स्वच्छता विषयक सुविधा पुरविण्याची जबाबदारी या पथकांवर आहे.



# पुण्यातील लोकसभा पोटनिवडणुक काँग्रेस लढवणार!

## परंपरागत काँग्रेसची जागा : काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी केले स्पष्ट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील लोकसभा मतदारसंघावर काँग्रेसने दावा केला आहे. पुण्यातील लोकसभा पोटनिवडणूक काँग्रेस लढणार असल्याचं काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट केलं आहे. परंपरागत काँग्रेसची ती जागा असल्याचे बाळासाहेब थोरात यांनी सांगत महाविकास आघाडी म्हणून पुण्यातील लोकसभेची निवडणूक लढू आम्हाला महाविकास आघाडीतील पक्ष सहकार्य करतील अशीच आमची मागणी आहे.**



बैठकीत तशी आम्ही मागणी करणार आहोत. असे देखील बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट केला आहे. ते पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसार माध्यमांशी बोलत होते.

बाळासाहेब थोरात म्हणाले, "लोकसभा निवडणुका आगामी काळासाठी महत्वपूर्ण ठरणार आहेत. विधानसभा निवडणूक देखील लागते आहे. महानगरपालिका निवडणूक लागण्याची शक्यता आहे. परंतु, सर्वच पक्षांचे लक्ष हे लोकसभेच्या निवडणुकीकडे आहे. महाविकास आघाडीत कोणाची ताकत जास्त आहे. यापेक्षा पारंपारिक निवडणूक कोण लढलं यावर चर्चा होते. पुण्यातील कसबा निवडणुकीत सर्वांचं सहकार्य झालं. पुण्यातील जागा काँग्रेसने आतापर्यंत लढवलेली आहे. आम्ही सर्व महाविकास आघाडी म्हणून पुण्यातील लोकसभा लढऊ. सर्वांनी आम्हाला सहकार्य करावे ही आमची मागणी आहे. बैठकीत तशी विनंती आणि करणार आहोत."

अजित पवारांच्या विधानावर म्हणाले, "चर्चा होत राहतील. परंतु, ज्याचा मतदारसंघ आहे. त्यानं ही जागा लढवावी. आम्ही आमच्या दाव्यावर ठाम आहोत. पुण्यातील जागाही पारंपारिक दृष्ट्या काँग्रेसची आहे.

काँग्रेस लढत आलेली आहे आणि आताही पुण्यातील लोकसभेची जागा आम्हाला हवी आहे. पुढे ते म्हणाले, ज्या ठिकाणी आमचे खासदार निवडून येतील अशा जागांसाठी आम्ही आग्रह करणार आहोत."

### शरद पवारांवरील टीकेला बाळासाहेबांचं प्रतिउत्तर!

बाळासाहेब थोरात म्हणाले, "राजकारण खालच्या पातळीला पोहोचलेलं आहे. आम्ही सध्या टीव्ही पाहणं सोडून दिलं. कोणीतरी काहीतरी बोलावं आणि ते जनतेने ऐकावं?. राजकारणी लोक आपली बोलण्याची आचार संहिता पाळणार नसतील तर चॅनेलवाल्यांनी तरी आचार संहिता करावी अशी माझी मागणी आहे. असे स्टेटमेंट असतील तर टीव्हीवाल्यांनी दाखवू नये. कोणी काय बोलावं याला काही लिमिट आहे की नाही? विधानसभेत सर्वात जास्त मी निवडून आलेलो आहे. माझ्या ४० वर्षाच्या राजकारणात असं पाहिलं नव्हतं. एकमेकांचा आदर करण्याची संस्कृती जपली पाहिजे."

# गणवेशाच्या निर्णयामुळे शाळांपुढे नवा पेच...

## पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना समान गणवेश देण्याचा हट्ट

।पुणे । महाईन्यूज

**'राज्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना समान गणवेश देण्याचा हट्ट सोडून दोन्ही गणवेशांची जबाबदारी पुन्हा शाळा व्यवस्थापन समितीवर सोपवण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला. मात्र आता शाळा सुरू होण्यास केवळ चारच दिवस असताना स्काऊट-गाईडसारखा गणवेश आणायचा कुठून, असा नवा पेच शाळांपुढे निर्माण झाला आहे. परिणामी पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना केवळ एकच गणवेश मिळू शकेल.**



राज्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना समान गणवेश देण्याचा हट्ट सोडून दोन्ही गणवेशांची जबाबदारी पुन्हा शाळा व्यवस्थापन समितीवर सोपवण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला.

राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी 'एक राज्य एक गणवेश' योजनेअंतर्गत राज्यातील शासकीय आणि अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना एकाच रंगाचा गणवेश देण्याची घोषणा केली होती. मात्र, अनेक शाळांनी गणवेश वाटपाची प्रक्रिया सुरू केल्याने नव्या शासकीय योजनेमुळे त्यात अडचणी निर्माण होण्याची चर्चा सुरू झाली. त्यानंतर शासनाकडून दोन गणवेशांऐवजी एक गणवेश देण्याचा निर्णय झाला. तर दुसरा गणवेश शाळा व्यवस्थापन समितीने देण्याचा मध्यम मार्ग काढण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४मध्ये विद्यार्थ्यांना गणवेश देण्याबाबत परिपत्रक प्रसिद्ध करून तीनशे रुपयांचा एक गणवेश शाळा व्यवस्थापन समितीने देण्याचे आदेश दिले. तर शासन स्तरावरून सूचना मिळाल्यानंतर उर्वरित एका गणवेशाबाबत पुढील कार्यवाही करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतर गुरुवारी नवा शासन निर्णय प्रसिद्ध करून स्काऊट आणि गाईड विषयास अनुरूप गणवेश शाळा व्यवस्थापन समितीमार्फत देण्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे आता चार दिवसांत गणवेश कुठून आणायचा हा नवा पेच निर्माण झाला आहे.

विद्यार्थ्यांना गणवेश देण्याबाबत सरकारच्या पातळीवर सावळा गोंधळ असल्याचे दिसते. आधी एक गणवेश देण्याचे निर्देश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने दिले. त्यानंतर गुरुवारी स्काऊट गाईडच्या गणवेशाशी साधर्म्य असलेला गणवेश देण्याचा शासन निर्णय प्रसिद्ध झाला. एका आठवड्यात दोन परिपत्रके आल्यामुळे शाळांच्या स्तरावर मोठा गोंधळ झाला असून, चार दिवसांत स्काऊट-गाईडसारखा गणवेश आणायचा कुठून हा प्रश्न आहे, असे मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य प्रवक्ता महेंद्र गणपुले म्हणाले.

# गोव्यातील 'कॅसिनो'त हरल्याने पुण्यातील व्यावसायिकाची आत्महत्या

। पुणे । महाईन्यूज ।



गोव्यातील कॅसिनोतील जुगारात पैसे हरल्याने पुण्यातील व्यावसायिकाने नैराश्यातून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दोन तरुणींनी फसवणूक करुन जुगारात हरविल्याने आत्महत्या करत असल्याचे व्यावसायिकाने आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत म्हटले आहे. या प्रकरणी विमानतळ पोलिसांनी दोन तरुणींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विकास शिवाजी टिंगरे (वय ५०, रा. धानोरी) असे आत्महत्या केलेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. त्यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अर्पिता दास (वय ३५) आणि सुश्मिता दास (वय ३३) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विकास यांच्या मुलाने विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. धानोरी जकात नाका येथील दुकानात विकास टिंगरे यांनी २३ मे रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. विकास व्यावसायिक होते. ते ऑनलाइन जुगार खेळत होते. तरुणींनी त्यांना गोव्यात जुगार खेळण्यास जबरदस्तीने बोलावले. त्यांनी कॅसिनोतील जुगारात पैसे जिंकल्यावर खेळ बंद करण्याचा निर्णय घेतला. मात्र, तरुणींना त्यांना खेळ बंद करू दिला नाही.

## राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांना जीवे मारण्याची धमकी दिलेल्या

# माथेफिरुंना तात्काळ अटक करा!

### राष्ट्रवादीचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांची मागणी

। पिंपरी।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना जीवे मारण्याची धमकी दिलेल्या माथेफिरूना तात्काळ अटक करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी पोलीस आयुक्तांकडे केली आहे.**

या निवेदनात गव्हाणे यांनी म्हटले आहे की, शरद पवार हे केवळ महाराष्ट्राचे नसून देशाचे नेते आहेत. देशातील प्रमुख दिग्गज राजकीय नेत्यांमध्ये शरद पवारांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांच्या जीवितास जर धोका निर्माण झाला तर देश पेटून उठेल. त्यामुळे शासनाने योग्य ती खबरदारी घ्यावी. कायदा आणि सुव्यवस्था योग्यप्रकारे हाताळावी. तसेच राज्याचे गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांनी खबरदारीचे उपाय करावेत. अन्यथा राष्ट्रवादीचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरून सरकारचा तीव्र निषेध करतील, असा इशाराही या निवेदनाद्वारे अजित गव्हाणे यांनी दिला.



**राष्ट्रवादीचे कार्यकर्ते-पदाधिकारी उपस्थित...**

यावेळी शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, शरद उर्फ राजू मिसाळ, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर, महिला अध्यक्ष कविताताई आल्हाट, युवक अध्यक्ष इम्रान शेख, कार्याध्यक्ष प्रशांत शितोळे, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे, माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, गोरक्ष लोखंडे,भोसरी विधानसभा अध्यक्ष पंकज भालेकर, चिंचवड विधानसभा अध्यक्ष विनोद नढे, ज्येष्ठ नेत्या शमिमताई पठाण, सामाजिक न्याय अध्यक्ष संजय औसरमल, झोपडपट्टी सेल अध्यक्ष संतोष निसर्गंध, व्यवस्थापन सेल अध्यक्ष अकबर मुल्ला, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कांबळे, अर्बन सेल महिला अध्यक्ष मनीषा गटकळ, महिला वरिष्ठ कार्याध्यक्ष कविताताई खराडे, चिंचवड विधानसभा संघटक मीरा कदम, भोसरी विधानसभा कार्याध्यक्ष ज्योती गोफणे, ज्येष्ठ नेत्या लता ओवाळ, अर्बन सेल चिंचवड विधानसभा निरीक्षक विजया काटे, सरचिटणीस राजेंद्र हरगुडे, राजन नायर, चिटणीस राजू चांदणे, महिला भोसरी विधानसभा अध्यक्ष सारिका हरगुडे, साफसफाई कामगार महिला अध्यक्ष सुवर्णा निकम, महिला उपाध्यक्ष मेघा पळशीकर, सपना कदम, रंजना रणदिवे इत्यादी कार्यकर्त्यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

---

## वाकड, भूमकर चौक, पुनावळे, देहूरोडमधील वाहतूक कोंडी सुटणार!

### ‘एलिव्हेटेड कॉरिडॉर’ची निर्मिती; शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

। पिंपरी । महाईन्यूज

**संतश्रेष्ठ जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील देहूरोड येथील सेंट्रल चौकातील आणि मुंबई-बंगळुरु महामार्गावरील वाकड, भूमकर चौक, पुनावळे, ताथवडेतील वाहतूक कोंडी लवकरच सुटणार आहे. किवळे जंक्शन ते बालेवाडी स्टेडिएमपर्यंत 8.6 किलोमीटर अंतरावर ‘एलिव्हेटेड कॉरिडॉर’ची निर्मिती करण्यात येणार आहे. त्याबाबतचा डीपीआर तयार असून यासाठी आवश्यक जागेचे महापालिकेने तातडीने भूसंपादन करण्याची सूचना शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला केली.**





पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतून जाणा-या मुंबई-बंगळुरु महामार्गावरील वाकड, भूमकर चौकातील आणि देहूरोड येथील वाहतूक कोंडी सोडविणे आणि भविष्यकालीन नियोजनाबाबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत सादरीकरण महापालिकेत सादरीकरण करण्यात आले. आमदार महेश लांडगे, अश्विनी जगताप, उमा खापरे, महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता प्रेरणा शिनकर, उपव्यवस्थापक अंकित यादव, सल्लागार भरत तोडकरी, ऋषीकेश कुमार आदी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, वाकड, ताथवडे, पुनावळे हा भाग नव्याने विकसित होत आहे. मोठ मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या उभारल्या जात आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीत वाढत आहे. भविष्यातही वाहतुकीची समस्या निर्माण होईल. त्यासाठी आत्तापासूनच नियोजन केले जात आहे. त्यासाठी किवळे जंक्शन ते बालेवाडी स्टेडिएमपर्यंत 8.6 किलोमीटर अंतरावर ‘एलिव्हेटेड कॉरिडॉर’ची निर्मिती करण्यात येणार आहे. त्याबाबतचा आराखडा तयार केला आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वरुन चार आणि खालच्या बाजुने चार लेन असणार आहेत. देहूरोड, किवळे, रावेत, पुनावळे, ताथवडे, भूमकर, चौक आणि वाकडमधील वाहतूक कोंडी सुटणार आहे.भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून हे काम करण्यात येणार आहे.

महापालिकेने आत्तापर्यंत 35 टक्के जागेचे भूसंपादन केले आहे. पूर्ण जागेचे तातडीने भूसंपादन करावे. जेणेकरून काम लवकर सुरू होईल. वाकड चौकात दोन मजली ब्रीज उभारला जाणार आहे. मुळा नदीवरील पुलाच्या उजव्या बाजुला तीन लेन वाढविल्या जाणार आहेत. मुठा नदीवरील पुलाच्या दोन्ही बाजुला तीन लेन वाढविल्या जाणार आहेत. किवळे चौक, समीर लॉन, पुनावळे, ताथवडे, भूमकर चौक आणि वाकड चौकातील अंडरपासमध्ये सुधारणा केली जाणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी सुटेल असा विश्वास खासदार बारणे यांनी केली.

# दंगलीचे व्रण कायम राहतात !



## भूमिका

निलेश दुटाळ
91- 87668 40811

जातीय आणि धार्मिक अहंकार दीर्घकाळ डोक्यात असला आणि त्याला पोषक वातावरण मिळाले की जातीधर्माचे तकलादू मुद्दे प्रत्येकाच्या कथित स्वाभिमानाचा विषय बनतो. अहंकार आणि स्वाभिमान यातील सीमारेषा लक्षात आली नाही तर सामाजिक किंवा गावाच्या हिताकडे दुर्लक्ष होऊन जाती धर्माचे अभिमान धारदार टोक काढून निरपराध लोकांना जखमी करायला सुरुवात करतात. हाच अभिमान दुराभिमानात बदलतो आणि जातींचा उन्माद अशावेळी आपला फणा वर काढत दिसेल त्याला दंश करीत सुटतो. त्यातून निर्माण होणाऱ्या कोणत्याही कृतींची फळे अतिशय कटू असतात. परस्परांना सतत पाण्यात बघणारी दुभंगलेली मने संधी मिळताच एकमेकांच्या रक्ताचे तहानलेले होतात आणि त्यात सामान्य आणि गरीब कुटुंबाचे बळी जातात. कोणत्याही दंगलीत सर्वाधिक हानी गरिबांची होऊन त्याचे व्रण कायम राहतात. आताच्या काळात ते टाळले जाऊ शकते फक्त प्रत्येकाने या अहंकाराला आपापल्या पातळीवर कमी करायला हवे.

अकोल्यात झालेली हिंदू -मुस्लिम दंगल असो वा नांदेड जिल्ह्यात झालेला अक्षय भालेरावचा खून असो या दोन्ही घटनात दोन पिढ्यानपिढ्या गावात राहणारे दोन समूह क्षणात परस्परांचे वैरी म्हणून उभे होतात. दंगल किंवा रक्तपात कोणत्याही पातळीवर अतिशय वाईटच असतो त्याचे कधीही समर्थन केले जाऊ शकत नाही. कोणताही सभ्य समाज त्याला अजिबात समर्थन देणार नाही. गेल्या काही वर्षात सगळ्याच क्षेत्रात प्रचंड स्पर्धा निर्माण झालेली असताना प्रत्येकाला पोटाची खळगी भरण्यासाठी दिवसाचे बारा तसाही कमी पडत असताना जातीय किंवा धार्मिक द्वेषाला खतपाणी घालण्यास



वेळ कुठून मिळत असावा हा खरा प्रश्न आहे. एखाद्या गावात दलित विरुद्ध सवर्ण यांच्यात विस्तव जात नसेल तर त्याच गावातील सृजन लोकांनी त्याला वेळीच शांत केले पाहिजे अन्यथा साचत जाणाऱ्या लहान सहन घटनांचा एकदिवस स्फोट होतो आणि त्याचे दीर्घकाळ परिणाम संपूर्ण समाज आणि गावाला भोगावे लागतात.

घटना जातीय असो वा धार्मिक ती काही अचानक घडत नसते फक्त तिचा स्फोट होतो तेव्हा लोकांना कळते मात्र आतून कुठेतरी धूर निघायला सुरुवात झालेली असते हे लक्षात घ्यायला हवे. अश्या घटनात टाळी एका हाताने कधीच वाजत नाही ,कुणाला वर्चस्व सहन होत नाही तर कुणी कायद्याने मिळालेल्या अधिकाराचा दुरुपयोग करण्यात सराईत बनलेले असतात. कधीकाळी होणाऱ्या मराठा बौद्ध वादात एक्ट्रोसिटी कायदा खलनायक बनल्याचे लक्षात येते. या कायद्याचा निरपराध लोकांवर जेव्हा राजकीय हेतूने गैरवापर होतो तेव्हा लोकांची सहानुभूती अन्यायग्रस्त व्यक्तीकडे झुकत असते. अक्षय भालेराव प्रकरणाच्या चर्चेच्या निमित्याने बहुसंख्य मराठा समूहाने या कायद्याच्या दुरुपयोगाकडे बोट दाखवले आहे. अनेक प्रकरणात या कायद्याचा दुरुपयोग होत असावा मात्र सरसकट दुरुपयोग होतो असे म्हणता येणार नाही कारण अहंकार अजूनही ताजे आहेत.

नव्या जगात वावरणाऱ्या शिक्षित आणि समाजभान असणाऱ्या तरुणांना किमान आपापल्या परिसरातील असे तणाव रोखता येतील त्यादिशेने पावले टाकली पाहिजेत. सामाजिक सलोखा संघ त्यासाठी प्रभावी काम करू शकतात. ज्या गावांमध्ये जातीय किंवा धार्मिक तणावाची स्थिती असेल अश्या ठिकाणी मानवतावादी आणि संविधान प्रेमी तरुणांनी एकत्र येऊन " सामाजिक सलोखा संघ " स्थापन केले पाहिजेत. कुणाच्या तरी राजकारण किंवा स्वार्थापोटी घडलेली घटनात ज्यांचे संसार उध्वस्त होतात त्यांना पुढे त्याचे परिणाम दीर्घकाळ भोगावे लागतात , काहीकाळ आप्त,स्वकीय किंवा नेते भेटी देतात ,तुटपुंजी मदतही करतात मात्र पुढे न्यायालयीन खटल्यांसाठी उपाशीपोटी अनेक वर्ष चपला झिजवण्याची वेळ गरिबांवर येते अशावेळी तारखेवर हजर राहण्यासाठी कुणी भाड्याचे पैसेही द्यायला तयार नसते. ज्याचे जळते त्यालाच कळत असते म्हणून हे टाळण्यासाठी आपण पुढाकार घेतला पाहिजे.

अकोला ही अनेक सामाजिक आणि राजकीय प्रयोगांची भूमी आहे. इथले प्रयोग राज्यस्तरावर वाखाणले जातात त्यामुळे या जिल्ह्यातील मराठा,मुस्लिम आणि बौद्ध तरुण आणि सुजाण नागरिकांनी " सामाजिक सलोखा संघाचा " प्रयोग करायला हरकत नाही. तुमचा भवताल जळत असताना तुम्ही काय करीत होते असा प्रश्न जेव्हा येणाऱ्या पिढ्या आपल्याला विचारतील तेव्हा किमान शरमेने आपली मान खाली गेलेली नसेल आपण ताठ मानेने सांगू शकलो पाहिजे की आम्ही विझवणाऱ्यापथावरचे कायम प्रवासी आहोत. सामाजिक सलोखा संघ केवळ उत्सवांच्या काळातच नव्हे तर इतरही काळात विविध जाती,धर्मातला संवाद कसा वाढेल यासाठी प्रयत्न करेल , एकत्र आल्याशिवाय मूळ प्रश्न समजणार नाहीत आणि संवाद साधल्यास कोणताही प्रश्न शिल्लक राहणार नाही हेच उत्तम संवादाचे बलस्थान आहे. चला त्या दिशेने पाऊले टाकायला सुरुवात करू या ...

## संपादकीय »

### 'जैविक' काच

***प्लास्टिक, काच यांसारख्या अनेक अजैविक घटकांचा आपल्या दैनंदिन जीवनाबरोबरच विकासाच्या प्रत्येक टप्प्यात अतिशय महत्त्वाचा सहभाग आहे. मात्र, त्याचा वापर विवेकी हवा. प्लास्टिक आणि काचेचे विघटन होण्यास शेकडो वर्षे लागतात. त्यांच्यापासून पुनर्निर्मिती होते, पण ती खूपच खर्चिक असते. .***

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, एकूण उत्पादनाच्या केवळ दहा टक्क्यांचाच पुनर्वापर होते आणि उरलेले सर्व कचऱ्याच्या ढिगाऱ्यात जाते. यावर एकच उपाय म्हणजे त्यांची जैविक पद्धतीने निर्मिती करणे. सिलिकायुक्त पदार्थाचा भट्टीमध्ये वितळलेला द्रव स्फटिकीभवन न होऊ देता, वेगात थिजू दिल्यास काचेची निर्मिती होते. फुटलेल्या काचेच्या मोठमोठ्या तुकड्यांचा पुनर्वापर होतो. मात्र, लहान तुकडे कचऱ्यात सहजपणे मिसळून हजारो वर्षे तसेच राहतात. यावर उपाय म्हणून चीनमधील शास्त्रज्ञांनी आता विघटन होणारी जैविक काच तयार केली आहे. वितळण्यापूर्वी त्यांची सक्रिय अग्रे रासायनिक पद्धतीने बदलून त्या द्रवरूप मिश्रणास एकदम थंड केले, त्यावेळी त्यांना आरपार दृश्य दिसणारी काच मिळाली.

**महाराष्ट्रात 'समृद्धी महामार्ग' सुरू झाल्यानंतर तेथे सातत्याने होणाऱ्या अपघातांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. असे सरळसोट, सिमेंटचे महामार्ग बांधून आपण नेमके काय भले करतो आहोत, याचा फेरविचार होणे आवश्यक आहे... महाराष्ट्रात एप्रिल ते जून आणि ऑक्टोबर ते डिसेंबर या काळात जास्त प्रवास होतो.**

## 'समृद्धी महामार्गा'वरील मृत्यूला जबाबदार कोण?



या काळात रोज अपघातांच्या बातम्या येत राहतात. यामुळे भावना बोथट झाल्या आहेत. अपघात व मृत्यू हा जणू जगण्याचा अविभाज्य भाग झाला आहे. दर बातमीचा शेवट होतो तो सरकारी मदतीच्या उल्लेखाने. अपघातांचे प्रमाण का वाढते आहे, याची चिकित्सा करायला हवी. मग उपाय शोधता येतील. बहुतेक अपघात मानवनिर्मित असतात. त्यावरचा इलाज शोधता येईल. मात्र, तो करण्याची मानसिकता हवी. रस्ते खूप चांगले झाले आहे. खरे तर, डांबर हे रस्त्यांसाठी व सिमेंट घरांसाठी आहे. सध्या रस्ते सिमेंटचे केले जातात. सिमेंट लवकर गरम होते व उशिरा थंड होते; त्यामुळे रस्त्याला लवकर तडे जातात. वाहनांचे टायरही खूप तापतात. घर्षणाने टायर फुटण्याचे प्रमाण सिमेंटच्या मार्गांवर जास्त आहे. टायर फुटल्याने अपघाताची तीव्रता वाढते. रस्त्याला बाजूची मार्गपट्टी गुळगुळीत व गोलाकार नसेल, तर टायर कापले जाते.

निसर्गाने युगानेयुगे नदी-नाल्यांची, पहाडांची, जमिनीची दिशा, तिचा उंचसखलपणा तयार केलेला असतो. यात काही अनैसर्गिक घडल्यास किंवा मुद्दाम घडविल्यास अपघातांची शक्यता वाढते. लांब पल्ल्याच्या रस्त्यांवर नेमके हेच होते आहे. मुंबई ते नागपूर हा समृद्धी महामार्ग निसर्गाच्या पूर्ण विरोधात जाऊन तयार केला आहे. हा व इतरही रस्ते हे भर टाकून फार उंच केले आहेत. याच अर्थ, ही भरावाची माती इतर ठिकाणी खड्डे खणून आणली असणार. तेथील निसर्गाचा समतोल त्याने गेलाच असणार. हा मार्ग बांधताना नैसर्गिक वळणे सरळ केली आहेत. काही ठिकाणे दरड व डोंगर पोखरून बोगदे काढले आहेत. निसर्गाला पूर्ण विसरून वाट्टेल तसे वाकविण्याची शिक्षा आपण भोगत आहोत. अशा सरळ व उंच महामार्गावर वाहकाला गाडीचे स्टिअरिंगही हलवावे लागत नाही. नकळत वेग वाढतो. क्षणाची डुलकी लागते.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक :** ***वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# औरंगजेब याच मातीतला!

## देवेंद्र फडणवीसांच्या वक्तव्यावर वंचितच्या प्रकाश आंबेडकरांचं उत्तर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुघल बादशाह औरंगचेबाचे पोस्टर आणि सोशल मीडिया स्टेटसवरून राज्यातलं वातावरण तापलं आहे. अहमदनगरच्या फकीरवाडा भागात रविवारी (०३ जून) संदल उरुसच्या मिरवणुकीत मुघल बादशाह औरंगजेबाचे पोस्टर झळकावत काही तरुणांनी नाच केला. तसेच या मिरवणुकीत त्यांनी घोषणाबाजी केल्याचाही आरोप केला जात आहे.**



या घटनेवरून राज्यातलं वातावरण तापलं आहे. त्यानंतर दोनच दिवसांनी कोल्हापुरातही मोठा राडा झाला आहे. सोशल मीडिया अकाऊंटच्या स्टेटसवर औरंगजेबाचा फोटो ठेवून औरंगजेबाचे उदात्तीकरण करणारा मजकूर शेअर करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी हिंदुत्ववादी संघटनांनी बुधवारी कोल्हापूर बंदची हाक दिली. तसेच कोल्हापुरात या घटनेमुळे अनेक ठिकाणी तणाव निर्माण झाला होता. या दोन्ही घटनांवरून राज्यातले सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर टीका करत आहेत. दरम्यान, या प्रकरणावर आता वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे.

### प्रकाश आंबेडकरांनी केला प्रश्न उपस्थित

**प्रसारमाध्यमांशी बोलत असताना देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की, अचानक ओरंगजेबाच्या एवढ्या अवलादी कुठून पैदा झाल्या याचा शोध घ्यावा लागेल, जाणूनबुजून कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्याचे प्रयत्न काहीजण करत आहेत. हे कोण करत आहे ते तपासून बघावं लागेल आणि कोणीही कायदा हातात घेतला तर त्याच्यावर कारवाई केली जाईल. फडणवीसांच्या याच वक्तव्यावर प्रकाश आंबेडकरांनी प्रश्न उपस्थित केला आहे. दोन दिवसांपूर्वी कोल्हापुरातील तणावावर बोलताना फडणवीस यांनी अशी प्रतिक्रिया दिली होती.**

प्रकाश आंबेडकरांना आज एका पत्रकार परिषदेवेळी माध्यमांच्या प्रतिनिधींनी औरंगजेब पोस्टर आणि सोशल मीडिया स्टेटस प्रकरणावर प्रतिक्रिया विचारली. त्यावर आंबेडकर म्हणाले, औरंगजेब या मातीतला आहे. औरंगजेब कुठून पैदा झाला असं विचारत आहेत, दुसरीकडे कुठे पैदा झाला असेल तर ते देवेंद्र फडणवीसांनी सांगावं.

# क्षुल्लक कारणासाठी शिवसेना-भाजपा युतीत मिठाचा खडा...

## मुख्यमंत्र्यांच्याच मुलाच्या उमेदवारीवरून खडाजंगीची शक्यता

। ठाणे । महाईन्यूज

**देशभरात आतापासूनच पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. बहुतांश पक्षांनी त्या दृष्टीने तयारी सुरू केली आहे. महाराष्ट्रातही सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये आपापसांत जागावाटप नेमकं कसं करावं यासंदर्भात बैठका आणि चर्चा सुरू झाल्या आहेत. दुसरीकडे वेगवेगळ्या जागांसाठी काही ठिकाणी मित्रपक्षांमधलेच अनेक उमेदवार इच्छुक असल्यामुळे वाद निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सत्ताधारी भाजपा-शिंदे गटामध्येही असाच काहीसा प्रकार घडताना दिसून येत आहे. कल्याण लोकसभा मतदार संघात चक्क मुख्यमंत्र्यांच्याच मुलाच्या उमेदवारीवरून खडाजंगी होण्याची शक्यता वर्तवली जाऊ लागली आहे.**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांच्या लोकसभा उमेदवारीवर आक्षेप घेतला जात आहे. कल्याणमध्ये भाजपाच्याच मर्जीच्या उमेदवाराला तिकीट मिळेल, अशी ठाम भूमिका स्थानिक भाजपानं घेतली आहे. “कल्याण लोकसभा मतदारसंघात भाजपा कार्यकर्ते सांगतील तोच उमेदवार मान्य केला जाईल. अन्य कोणता उमेदवार सहन केला जाणार नाही”, अशी भूमिका भाजपाच्या कल्याण लोकसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत शुक्रवारी (०८ जून) घेण्यात आली आहे. या बैठकीला सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यासह पक्षाचे प्रमुख नेते, आमदार, पदाधिकारी उपस्थित होते. यावर आता खासदार श्रीकांत शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. श्रीकांत शिंदे म्हणाले, मी हे वाक्य ऐकलं आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून पाहिलं. मला वाटतं कल्याण लोकसभेचा उमेदवार कोण असेल याचा निर्णय वरिष्ठ पातळीवरून घेतला जाईल. जो उमेदवार योग्य असेल त्याला उमेदवारी दिली जाईल.



### ...तर उद्या राजीनामा देईन : श्रीकांत शिंदे

**खासदार श्रीकांत शिंदे म्हमाले, मला जर सांगितलं कल्याण लोकसभेचा (खासदारकीचा) राजीनामा द्या, तर मी उद्या राजीनामा द्यायला तयार आहे. पूर्णवेळ पक्षाचं काम आणि युतीचं काम करायला मी तयार आहे. जर उद्या मला पक्ष नेतृत्वाने सांगितलं किंवा तुम्ही सांगितलं, हवं तर तुम्ही सांगा तुम्हाला त्या ठिकाणी कल्याण लोकसभेसाठीचांगला उमेदवार मिळतोय, तर त्याला निवडून आणण्यासाठी तुम्ही जसं काम कराल तसा मी ही काम करायला तयार आहे. आमचा उद्देश एकच आहे.**

# भाजपाने बदलली रणनीती; आता एनडीएतील मित्रपक्षांना एकत्र करण्याची तयारी सुरू



। मुंबई । महाईन्यूज

कर्नाटका विधानसभेच्या निवडणुकीत पराभव झाल्यानंतर भाजपाने आपल्या निवडणूक रणनीतीमध्ये अनेक बदल केले आहेत. लोकसभा निवडणूक २०२४ साठी मित्रपक्षांना जवळ करण्याचा प्रयत्न भाजपाने सुरू केला आहे.

लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी देशभरातील विरोधी पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली असताना भाजपानेही एनडीएची पुनर्रस्थापना करण्याचा विचार केला आहे.

नुकत्याच झालेल्या कर्नाटक निवडणुकीत भाजपाला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला. त्या पार्श्वभूमीवर आता भाजपाने एनडीएमधील मित्रपक्षांना पुन्हा एकदा साद घालण्याचा प्रयत्न सुरू केला असून आपल्या भूमिकेत लवचिकता आणली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा एनडीएला मजबूत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### या पक्षांसोबत चर्चा सुरू

भाजपामधील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भाजपा नेतृत्वाने कर्नाटकमधील जनता दल (धर्मनिरपेक्ष), आंध्र प्रदेश आणि तेलंगणामधील तेलगु देसम पार्टी (TDP) आणि पंजाबमधील शिरोमणी अकाली दलासोबत आघाडीसंबंधी चर्चा सुरू केली आहे.

# “प्रेमात सगळ्यात महत्त्वाची गोष्ट...” नातं टिकवण्यासाठी रितेश देशमुखचा मोलाचा सल्ला

सध्या रितेश देशमुख आणि जिनिलीया देशमुख यांची जोडी चांगलीच गाजतीये. या दोघांचा ‘वेड’ हा मराठी चित्रपट प्रदर्शित झाला ज्याने संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावलं आहे. रितेश देशमुखने या चित्रपटातून दिग्दर्शनात पदार्पण केलं आहे. शिवाय जिनिलीया देशमुखचा हा पहिलाच मराठी चित्रपट आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवरही तूफान कमाई करत आहे.

केवळ महाराष्ट्र आणि भारतच नव्हे तर परदेशातील लोकांनाही या चित्रपटाने अक्षरशः ‘वेड’ लावलं आहे. नुकतंच या दोघांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण करून २० वर्ष पूर्ण झाली. ‘तुझे मेरी कसम’ या चित्रपटातून दोघांनी या मनोरंजनविश्वात पदार्पण केलं होतं. या २० वर्षपूर्तीनिमित्तच्या



एका कार्यक्रमात दोघांनी चाहत्यांशी आणि पत्रकारांशी भरपूर गप्पा मारल्या. यादरम्यान रितेश आणि जिनिलीया या दोघांनी त्यांच्या नात्यामागचं सीक्रेट शेअर केलं. प्रेम आणि आदर यापैकी सर्वात महत्त्वाची गोष्ट कोणती हे उलगडून सांगताना रितेश म्हणाला, “प्रेमात सर्वात महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर ती आहे रीस्पेक्ट म्हणजेच आदर, तुम्ही तुमच्या जोडीदारावर प्रेम करता पण तो तुम्हाला योग्य तो सन्मान देत नसेल तर ते फार चुकीच आहे. कमी प्रेम भरपूर आदर हे एकवेळ चालेल, पण भरपूर प्रेम आणि कमी आदर यामुळे कधीही कोणतंही नातं टिकू शकत नाही.”

चित्रपटगृहातही ‘वेड’ चांगलीच कामगिरी करणार असा सगळ्यांचा विश्वास होता आणि तो सार्थ ठरला आहे. या चित्रपटात रितेश-जिनिलियाबरोबरच अभिनेते अशोक सराफ, शुभंकर तावडे, जिया शंकर यांच्याही महत्वपूर्ण भूमिका आहेत. याबरोबरच अभिनेता सलमान खान या चित्रपटात पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत झळकला आहे.





# करियर संपलं पण बिपाशा आजही कमवते करोडो रुपये

आज चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व बिपाशा बसू यांचा वाढदिवस आहे. बॉलिवूडची ही ब्युटी क्वीन अनेकदा तिच्या लूक आणि स्टाइलमुळे चर्चेत असते. बिपाशा बसूने 2016 मध्ये टीव्ही मालिकेत आपली छाप पाडणाऱ्या करण सिंग ग्रोवरसोबत लग्न केले. बिपाशा आणि करणची गणना खूप श्रीमंत जोडप्यांमध्ये केली जाते. बिपाशाने चित्रपटांच्या दुनियेत खूप नाव कमावले आहे पण तुम्हाला माहिती आहे का या अभिनेत्रीची एकूण संपत्ती किती आहे? त्याच्या एकूण संपत्तीबद्दल जाणून घेऊया.

बिपाशा बसू मुख्यतः तिच्या चित्रपट आणि जाहिरातींमधून मोठी कमाई करते. बिपाशा तिच्या प्रत्येक चित्रपटासाठी करोडो रुपये मानधन घेते. बिपाशा बसूची एकूण संपत्ती 15 मिलियन डॉलर म्हणजेच जवळपास 113 कोटी रुपये आहे. यासोबतच बिपाशा बसूचे मुंबई (वांद्रे) येथे 16 कोटी रुपयांचे आलिशान घर आहे, ज्यामध्ये ती तिच्या पतीसोबत आनंदी जीवन जगत आहे.

# अक्षय कुमारवर खळबळजनक आरोप

मुंबई: समीक्षक आणि अभिनेता कमाल रशीद खान उर्फ केआरकेने नेहमीच बॉलिवूडला लक्ष्य केले आहे. आता त्याने एक खळबळजनक ट्वीट करत अक्षय कुमारवर नवा हल्ला चढवला. शाहरुख खान, सलमान खान आणि आमिर खानसारखे बॉलिवूड कलाकार, करण जोहरसारखे चित्रपट निर्माते आणि 'पठाण', 'किसी का भाई किसी की जान' अशा हिंदी चित्रपटांना फटकारण्याची संधी सोडत नाही. केआरकेने अलीकडेच केलेल्या एका ट्वीटमध्ये अक्षयने त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे. अक्षयने त्याला मारण्याचा प्रयत्न केला असे म्हणत KRK ने त्याच्यावर जोरदार टीका केली. त्याने असेही म्हटले की जर येणाऱ्या काळात त्याची हत्या झाली, सलमान खान, शाहरुख खान किंवा करण जोहरने नाही तर हे अक्षयने केले असेल हे सर्वांना कळले पाहिजे. केआरकेने पुढे असेही म्हटले की, अक्की बऱ्याच काळापासून त्याला मारण्याचा प्रयत्न करत होता कारण त्याला केआरकेने 'कॅनेडियन कुमार' म्हणू नये असे त्याला वाटत होते.



# बाल कलाकारांचीच हवा...

मालिकांमध्ये बहुतांश वेळा मुख्य स्थानी तरुण नायक-नायिका दिसून येतात. पण सध्या सुरू असलेल्या काही मालिकांमध्ये मध्यवर्ती भूमिकेत बालकलाकार झळकत आहेत. या मालिकांना विशेष पसंती मिळत असून त्यातील बालकलाकारांच्या कामाचं कौतुक केलं जातंय.

**रुहानिका धवन**

दैनंदिन मालिकांमध्ये मुख्य कथानक एरवी नायक-नायिका, कुटुंब यांच्याभोवती गुंफलेलं दिसतं. पण सध्याच्या काही मालिकांवर नजर फिरवली असता बालकलाकार मध्यवर्ती व्यक्तिरेखा साकारताना दिसताहेत. काही मालिका या छोटे कलाकार साकारत असलेल्या व्यक्तिरेखांभोवती फिरत आहेत.

तर काही मालिकांचे विषय वेगळे असले तरी सध्याचं कथानक लहान मुलांच्या व्यक्तिरेखा केंद्रस्थानी ठेवून लिहिलं आहे. केवळ कथानकाला पूरक म्हणून काही प्रसंगांमध्ये दिसणारे बालकलाकार आता मध्यवर्ती व्यक्तिरेखा साकारू लागले आहेत. या मालिकांमध्ये मुख्य भूमिकेत असणाऱ्या बालकलाकारांना प्रेक्षकांची पसंती मिळतेय. मालिकांमध्ये काम केल्यानंतर आता या बालकलाकरांना नाव, पैसा फेम या तिनही गोष्टी मिळत आहेत. मालिकेमुळं प्रचंड लोकप्रिय झालेली एक बालकलाकार म्हणजे रुहानिका धवन. तिनं वयाच्या पंधराव्या वर्षीच कोट्यवधींचं घर खरेदी केलं. त्यामुळं ती सध्या चर्चेत आलीये.



रुहामिकानं 'ये है मोहब्बते' या हिंदी मालिकेमध्ये रुहीची भूमिका साकारली होती. रुहानिकानं तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर घर खरेदी केल्याचं चाहत्यांसोबत शेअर केलंय. तसंच एक खास सीक्रेटही सांगितलं. की, केवळ १५ व्या वर्षी तिनं घर कसं काय खरेदी केलं.रुहानिकानं इन्स्टाग्रावर नवीन घराचे सुंदर फोटो शेअर केले आहे. तिचं स्वप्नातं घर असं तिनं म्हटलंय. यावर तिच्या चाहत्यांनी लाइक्स कमेंट्सचा वर्षाव करत तिला शुभेच्छा दिल्यात.

रुहानिकानं लिहिलं की, माझं स्वप्न सत्यात उतरलंय, याचा आनंद होतेय.हे घर घेणं माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे, असं तिनं म्हटलंय.

**आईमुळं शक्य झालं...**

रुहानिका हे घर घेणं केवळ आईमुळंच शक्य झाल्याचं म्हटलंय. तिच्या आईनं मिळालेलं मानधन खर्च न करता बचत करून ठेवलं होतं. ही तर केवळ सुरुवात आहे. आणखी मोठी स्वप्न पूर्ण व्हायची आहेत, असं तिनं म्हटलं होतं.

# कांगारूंना वाटते टीम इंडियाची भीती!

## » ड्रायव्हिंग सीटवर असूनही 20 वर्षे जुन्या पराभवाची होतेय चर्चा

| लंडन |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

धोनीचा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२१-२३चा अंतिम सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात इंग्लंडमधील ओव्हल येथे खेळला जात आहे. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४६९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताने पहिल्या डावात २९६ धावा केल्या. पहिल्या डावाच्या आधारे ऑस्ट्रेलियाकडे १७३ धावांची आघाडी आहे. रहाणे-शार्दुलच्या अर्धशतकाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताने कमबॅक केले. मात्र, तरीही टीम इंडिया मागे आहे. असे असूनही कांगारूंना २०वर्षे जुना पराभव आठवत आहे.



ऑस्ट्रेलियाने ट्रेव्हिस हेड आणि स्टिव्ह स्मिथ यांच्या शतकांच्या जोरावर ४६९ धावा उभ्या केल्या. त्यानंतर दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताने ५ बाद १५१ धावा केल्या होत्या. भारत ३१८ धावांनी पिछाडीवर होता. आता तिसऱ्या दिवसाचा खेळ सुरू झाला तेव्हा भारताने पहिल्या डावात २९६ धावा केल्या. या लढतीत टीम इंडिया सध्या बॅकफुटवर दिसत आहे आणि ऑस्ट्रेलियाच्या गटात तसेच चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. अनेकांना वाटत आहे की भारत ही हा ट्रॉफी गमावेल. पण टीम इंडियाचा इतिहास मात्र काही वेगळेच सांगतो.

द्रविड आणि लक्ष्मणने ॲडलेडमध्ये शानदार कामगिरी केली

परंतु त्या सामन्यात भारतीय संघानेही पहिल्या डावात ५२३ धावा केल्या होत्या. टीम इंडियासाठी पहिल्या डावात राहुल द्रविड आणि व्हीव्हीएस लक्ष्मण यांनी अप्रतिम फलंदाजी दाखवली. त्यानंतर द्रविडने क्रमांक-३वर फलंदाजी करताना २३३ धावांची खेळी केली. लक्ष्मण सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आला आणि त्याने १४८ धावा केल्या.

आगरकरने ६ विकेट्स घेत खेळाला कलाटणी दिली, जरी टीम इंडिया पहिल्या डावात २३ धावांनी मागे होती, परंतु त्यांनी दुसऱ्या डावात दमदार गोलंदाजी करत ऑस्ट्रेलियन संघाला १९६ धावांत गुंडाळले. अशाप्रकारे त्या कसोटी सामन्यात भारतीय संघाला २३० धावांचे लक्ष्य मिळाले. गोलंदाजीत वेगवान गोलंदाज अजित आगरकरने दुसऱ्या डावात भारतीय संघासाठी जबरदस्त कामगिरी केली. यानंतर दुसऱ्या डावात भारतीय संघाने ६ गडी गमावून २३३ धावा केल्या आणि सामना ४ गडी राखून जिंकला. अशा परिस्थितीत भारतीय संघाला डब्ल्यूटीसी फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध बाजी मारायची असेल, तर तीच ॲडलेड कसोटीची जादू दाखवावी लागेल.

### ॲडलेडची जादू दाखवावी लागणार

»आज तिसऱ्या दिवशी (९ जून) भारतीय संघ १५१ धावांच्या पुढे खेळण्यास सुरुवात करेल. आता टीम इंडियाला इथून हा सामना जिंकायचा असेल, तर तिला २० वर्ष जुन्या जादूची पुनरावृत्ती करावी लागेल. टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाविरुद्धही ही जादू केली होती. खरं तर, आम्ही बोलत आहोत भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात २००३च्या उत्तरार्धात झालेल्या कसोटी मालिकेबद्दल. त्या मालिकेतील दुसरा कसोटी सामना ॲडलेड येथे १२ ते १६ डिसेंबर दरम्यान खेळला गेला. त्या सामन्यातही ऑस्ट्रेलियन संघाने प्रथम फलंदाजी करताना ५५६ धावांची मोठी धावसंख्या उभारली होती. टीम इंडियाकडून फिरकीपटू अनिल कुंबळेने ५ विकेट्स घेतल्या होत्या.

# रहाणेच्या खेळीनंतरही टीम इंडिया बॅकफुटवर

## » तिसऱ्या दिवसअखेर ऑस्ट्रेलिया 296 धावांनी आघाडीवर

| रियाध|
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२१-२३चा अंतिम सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात इंग्लंडमधील ओव्हल येथे खेळला जात आहे. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४६९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताने पहिल्या डावात २९६ धावा केल्या. पहिल्या डावाच्या आधारे ऑस्ट्रेलियाकडे १७३ धावांची आघाडी होती. दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाने ४ गडी गमावून १२३ धावा केल्या. सामन्यात ऑसी संघ भक्कम स्थितीत असून अजिंक्य रहाणेच्या शानदार खेळीनंतरही भारतीय संघ पिछाडीवर आहे.



लंडनमधील ओव्हल मैदानावर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळल्या जात असलेल्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिपचा अंतिम सामना रोमांचक वळणावर पोहोचला आहे. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात चार गडी गमावून १२३ धावा केल्या आहेत. सध्या कॅमेरून ग्रीन सात आणि मार्नस लाबुशेन ४१ धावांवर नाबाद आहे. भारतीय संघ आता चौथ्या दिवशी ऑस्ट्रेलियाला लवकरात लवकर गुंडाळण्याचा प्रयत्न करेल. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४६९ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताचा पहिला डाव २९६ धावांवर आटोपला. अशा स्थितीत ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या डावात १७३ धावांची आघाडी मिळाली. दुसऱ्या डावात १२३ धावांची भर घातल्याने ऑस्ट्रेलियन संघाची एकूण आघाडी आतापर्यंत २९६ धावांची झाली आहे.

अजिंक्य रहाणेच्या हुशारीपुढे अंपायर फेल! आउट जाहीर होताच सेकंदात पॅट कमिन्सची मोठी चूक पकडली, DRS VIDEO पहा

दुसऱ्या डावात उस्मान ख्वाजा १३ धावा, डेव्हिड वॉर्नर एक धावा, स्टीव्ह स्मिथ ३४ धावा आणि ट्रॅव्हिस हेड १८ धावा करून बाद झाला. भारताकडून रवींद्र जडेजाने दोन विकेट्स घेतल्या. त्याचवेळी मोहम्मद सिराज आणि उमेश यादव यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. जडेजाने मागील डावातील दोन्ही शतकवीर स्मिथ आणि हेड यांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले.

### सामन्यानंतर हरभजन काय म्हणाला?

फिरकीपटू हरभजन सिंग म्हणाला की, "कौशल्याची कमतरता नाहीये. जितके मोठे सामने खेळतील, तितके चांगले राहील. मला वाटते की, अशा सामन्यात मोकळेपणाने खेळण्याची गरज आहे. आपण खूपच बचावात्मक खेळत आहोत. आपल्याला निकालाची चिंता न करता खेळावे लागेल." पुढे बोलताना तो म्हणाला की, "खेळाडूंवर जबाबदारी टाका आणि ते नक्कीच आपले काम पूर्ण करतील. त्यांच्यावर दबाव टाकला जावा जर ते चांगले खेळले नाहीत, तर काहीजण बाहेर होतील आणि काही नाही. यामुळे भारताला आधीक पर्याय उपलब्ध होतील."

# अजिंक्य एकटाच लढला पण एका चुकीचा मोठा फटका बसला

| लंडन |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |



अंगावर दुखापत झेलून अजिंक्य रहाणे हा मैदानात ठामपणे उभा राहिला. अजिंक्यने झुंजार खेळी साकारली. पण त्याच्याकडून एक मोठी चूक घडली आणि त्याचा फटका भारतीय संघाला बसला.

अजिंक्य जेव्हा फलंदाजीला आला तेव्हा भराताचे नामांकित फलंदाज तंबूत परतले होते. त्यावेळी एकटा अजिंक्य हा खेळपट्टीवर ठाण मांडून उभा राहीला होता. यावेळी अजिंक्यला दुखापत झाली. त्याच्या हाताला चेंडू लागला. त्यानंतर डॉक्टरांनी मैदानात धाव घेतली. पण अजिंक्यने मैदान सोडले नाही. तो योद्ध्यासारखा लढतच राहीला. पण एका चुकीने मात्र त्याला घात केला.

अजिंक्यला या खेळीत दोन वेळा जीवदानही मिळाले. या दोन्ही जीवदानांचा फायदा नक्कीच रहाणेने घेतला. त्यामुळे रहाणे आता या चुका सुधारून शतक झळकावेल असे वाटत होते. पण अजिंक्य ज्या धावसंख्येवर उपहाराच्यावेळी खेळत होता त्याच धावसंख्येवर तो बाद झाला. त्यामध्ये त्याला एकाही धावेची भर घालता आली नाही. कारण अजिंक्यकडून यावेळी एक मोठी चूक घडली. यापूर्वी ऑफ स्टम्पच्या बाहेरील बॉल खेळत असताना त्याला समस्या जाणवत होती. त्यामुळे तो ऑफ स्टम्पच्या बाहेरील चेंडू खेळण्याचे टाळेल, असे वाटत होती. पण कमिन्सच्या ऑफ स्टम्पच्या बाहेरील चेंडू मारण्याची तो गेला, ज्याची गरज नव्हती आणि त्यामध्ये अजिंक्य आपली विकेट गमावून बसला. त्यामुळे फक्त एका चुकीमुळे अजिंक्यचे शतक हुकले. अजिंक्य सामन्याच्या दुसऱ्या दिवशी फलंदाजीला आला.